पिट्सबर्ग मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. संगीता बोकील व कार्यकारिणी, मंडळाचे इतर सभासद, मुलांचे आई-बाबा/आजी-आजोबा या सर्वांनी मुलांना हवी ती मदत उपलब्ध करून दिली. परंतु कार्यक्रमाच्या आणि नृत्यांच्या निर्मिती प्रक्रीयेत ढवळाढवळ न करता मुलांना त्यांचे निर्णय घ्यायचं संपूर्ण स्वातंत्र्य दिलं गेलं. आणि ह्या स्वातंत्र्याचं मुलांनी चीज केलं ही खरोखरच आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे! तरूण मराठी अमेरिकन पिढीच्या यशस्वितेची खात्री बाळगत पिट्सबर्गचे रहिवासी घरोघरी परतले ते पुन्हा अशा तऱ्हेचा कार्यक्रम केलाच पाहिजे अशी मनाशी खूणगाठ बांधूनच !

**डॉ. प्रियदर्शन मनोहर (पिट्सबर्ग)**

***

## ' पोपटपंची '- निखळ चावट 'मॉडर्न' तमाशा

कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन (कला) या संस्थेने ४ एप्रिल २०१० रोजी सॅन फ्रान्सिस्को, बे एरियामध्ये शफाअत खान लिखित 'पोपटपंची' या नवीन नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग केला. महाराष्ट्रात शफाअत खान यांनी या नाटकाचे अनेक वेळा वाचन केले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे या नाटकाचा जगातला पहिला प्रयोग करण्याची संधी महाराष्ट्रातील व्यावसायिक संस्थेला नव्हे तर 'कला' ह्या अमेरिकेतील हौशी रंगकर्मींच्या संस्थेला मिळाली.

'पोपटपंची' नाटकाची मांडणी १२व्या शतकात संस्कृतमध्ये लिहीलेल्या 'शुकसप्तती' या ग्रंथावर आधारलेली आहे. 'शुकसप्तती' ग्रंथात एक व्यापारी दूरच्या प्रवासाला निघण्यापूर्वी आपल्या पत्नीच्या पाळीव पोपटाला दररोज रात्री पत्नीला एक नवीन गोष्ट सांगण्याचे काम सोपवतो. हेतू हा की पत्नी गोष्टीत गुंतून जावी आणि तिने आपल्या प्रियकराला भेटायला जाऊ नये. पोपट ७० रात्री ७० नवीन गोष्टी सांगतो. गोष्टीत गुंगून पत्नी घराबाहेर पडत नाही.

'पोपटपंची' मध्ये घाबरट डॉन, त्याची बिअर बार-बाला बायको मैना, डॉनने घडवलेला आश्रमातला बुवा, त्याचा बायकोला गोष्टी सांगण्यासाठी बनवलेला पोपट, गुंड मिर्ची, इमानदार हवालदार, त्याची सदा चाळवलेली बायको, गोंधळलेला पोलिस कमिशनर, कॉस्मेटीक सर्जरी करणारा डॉक्टर, आश्रमात इंग्लंडहून आलेली मुलगी असा सगळा स्फोटक मसाला आहे. बाँब शोध पथकातील कुत्री गरोदर होते म्हणून हवालदाराला नोकरीवरुन काढून टाकण्यात येतं इथून गोष्टीला सुरुवात होते. मग हवालदाराची चौकशी, नार्को टेस्ट, कमिशनरची अचानक 'राधा' होणं, मैना आणि पोपट बनून तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठी राहिलेल्या बुवांचच प्रेम जुळणं, हवालदाराची बायको आणि डॉक्टर यांनी लग्न ठरवणं, आश्रमात बुवाची गादी सांभाळणाऱ्या मिर्चीने इंग्लंडहून आलेल्या मुलीशी सूत जमवणं अशी अनेक उलटसुलट वळणं घेताघेता पोपटाच्या गोष्टीतील सर्व पात्रं पोपट आणि मैनाच्या जगण्यातंच ढवळाढवळ करू लागतात आणि गोष्टीतली गोष्ट अधिकच गुंतागुंतीची होत जाते.

बे एरियाच्या स्टेजवरचं हे पहिलं R-Rated नाटक सादर करुन 'कला' या संस्थेने वेगवेगळे प्रयोग करत राहण्याची आपली परंपरा चालू ठेवली. प्रेक्षकांच्या प्रतिक्रीयांवरुन हा प्रयोग यशस्वी झाला असेच म्हणावे लागेल. 'कला' चे ध्येय आहे-

कलेमधून...कलेसाठी... कलारत रहायचं. 'कला' बद्दल अधिक माहिती: www.calaaonline.com

## पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन



अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे ९०वे आणि भारताबाहेरील पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन २८ ते ३१ मे दरम्यान न्यू जर्सी येथे 'राहवे' शहरातील 'युनिअन कौन्टी परफॉर्मिंग आर्टस् सेंटरच्या प्रेक्षागृहात सुमारे १३०० नाट्यप्रेमींच्या उपस्थितीत संपन्न झाले. संमेलन जाहीर झाल्यावर सुरवातीला उत्तर अमेरिकेतील मराठी नाट्य रसिकांकडून मिळालेला अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद व त्यामुळे संमेलनस्थळात करावा लागलेला बदल, संमेलनाच्या अध्यक्षपदावरून महाराष्ट्रात झडलेले वादविवाद, भारतातून येणाऱ्या कलावंतांना व्हिसा मिळण्यास झालेला विलंब, अशा अनेक अडचणींना तोंड देऊन संमेलन यशस्वी होण्यामागे नाट्यपरिषदेच्या न्यू जर्सी शाखेच्या अध्यक्षा डॉ. मीना नेरुरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अथक परिश्रम कारणीभूत आहेत. या परिश्रमांच्या जोडीने महाराष्ट्र शासन व महाराष्ट्रातील आणि उत्तर अमेरिकेतील अनेक दानशूर व्यक्ती व संस्थांचे आर्थिक पाठबळही या संमेलनाला मिळाले.

संमेलनाचे औपचारिक उद्घाटन जरी २९ तारखेला झाले, तरी त्याच्या पूर्व- संध्येला म्हणजेच २८तारखेला अमेरिकेतील पारितोषिक विजेत्या 'मुक्तीधाम', निळाई आणि पसारा', व 'घर दोघांचे' या तीन एकांकिकांद्वारे कार्यक्रमांना प्रारंभ झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी नाट्यसंमेलनांच्या नेहमीच्या प्रथेनुसार ढोल, लेझीम, ताशे यांच्या जल्लोषात शानदार दिंडी निघाली व पालखीतून श्री नटेश्वराचे रंगमंचावर आगमन झाले. सुरवातीला पारंपरिक नांदी झाल्यावर डॉ. मीना नेरुरकर लिखित व दिग्दर्शित 'जुळले नाते मनामनाचे' ही दीर्घांकिका फिलाडेल्फियाच्या कलावंतांनी सादर केली. सव्वाशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील तत्कालीन समाजाचा विरोध पत्करून अमेरिकेत वैद्यकीय शिक्षणासाठी आलेल्या आनंदीबाई जोशींचा जीवनपट उलगडणारी ही कलाकृती प्रेक्षकांना अतिशय आवडली. दीर्घांकिका संपल्यावर, आनंदीबाई जोशींचे अमेरिकेतील पालकत्व स्वीकारलेल्या कार्पेन्टर कुटुंबाच्या वारसदार श्रीमती नॅन्सी स्टोन यांना रंगमंचावर पाचारण करून डॉ. मीना नेरुरकरांनी त्यांची घेतलेली मुलाखत कमालीची रंगली.



यानंतरच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भारताचे कृषी मंत्री श्री. शरद पवार, महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील, संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत, नाट्यपरिषदेचे अध्यक्ष